**प्रेसनोट**

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०७.०३.२०२३

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुददा व कार्यालयाचा पत्ता | रामेश्वर सोमेश्वर मलमकर, वय ४९ वर्षे, पद – तलाठी, ग्राम सज्जा कळमगाव ता. चांदुर रेल्वे जि. अमरावती. रा. जावरकर मंगल कार्यालयसमोर, नक्षत्र रेसीडेन्सी फ्लॅट न. ३०८, अमरावती (वर्ग 3) |
| ३ | अपराध घडला ता. व वेळ | ०७/०३/२०२६ चे ११/०० ते १२/३० वा.दरम्यान |
| ४ | घटनास्थळ | विरुळ स्टॉप, चांदुर रेल्वे, जि. अमरावती |
| ५ | मागणी केली लाच रक्कम | ७,०००/–रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | ७,०००/–रुपये |

**थोडक्यात हकिकत** :– यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वडीलांची नावे शेती असुन आईवडील वयोवृध्द असल्याने शेतीचे व घरातील सर्व आर्थिक व्यवहार तक्रारदार हेच बघत असुन त्यांचे शेतात संत्रा, सोयाबिन, तुर व हरभरा असे पीक असुन शेताचे अतीवृष्टी मुळे नुकसान झाले त्या नुकसान भरपाई करीता तक्रारदार यांनी पीक विमा काढला होता. म्हणुन तक्रारदार यांचे शेतीचे झालेल्या नुकसानीचा पंचनामा करायला तलाठी श्री राजेश्वर मलमकर तलाठी सज्जा कळमगाव हे आले होते. शेतमालाच्या नुकसानाचा पंचनामा केला. त्याचे पैसे तक्रारदार यांचे वडीलांचे बॅक खात्यात ९७,५००/– रुपये जमा झाले. परंतु केलेल्या कामाचा बक्षिस म्हणुन तलाठी मलमकर यांनी तक्रारदार यांना १०,०००/– रुपयाची मागनी केली आहे. अशी दिनांक ०६/०३/२०२६ रोजी तक्रार दीली.

सदर तक्रारी वरून आज दि. ०७.०३.२०२६ रोजी वरील नमुद आलेसे यांनी पडताळणी कारवाई दरम्यान शेतमालाच्या नुकसानाचा पंचनामा केला. त्याचे पैसे तक्रारदार यांचे वडीलांचे बॅक खात्यात ९७,५००/– रुपये जमा झाले. परंतु केलेल्या कामाचा बक्षिस म्हणुन तलाठी मलमकर यांनी तक्रारदार यांना ७,०००/– रुपयाची मागनी करुन लाच स्विकारण्याचे पंचासमक्ष मान्य केले व सापळा कार्यवाही दरम्याण आलोसे यांनी पंचासमक्ष लाचरक्कम स्विकारली. वरुन आलोसे यांना ताब्यात घेवुन त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. बापू बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती., मा. श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, पो.नि. सुजाता बन्सोड, पो. अंमलदार प्रमोद रायपुरे, युवराज राठोड, चालक पोउपनि सतीश कीटुकले, यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क :–१. श्री. बापू बांगर पोलीस अधीक्षक ला.प्र.वी अमरावती परीक्षेत्र अमरावती मो.न. ९०११३२३४२६
२. श्री सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक ला.प्र.वी अमरावती मो.न. ९७६४२१०४८५
३. श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, घटकप्रमुख ला.प्र.वि.अमरावती मो.न.९८२३१११११५५, ७५१७५७१०६४

कार्यालयीन पत्ता : अॅन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन नं ०७२१–२५५२३५५, मो.न.९४०४२९९६२६, टोल फ्रि नंबर– १०६४.

सुजाता गुलाबराव बन्सोड
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती